# केजरीवाल, बेदी, सिसोदिया यांची हकालपट्टी अण्णा हजारे करणार होते

नवी दिल्ली, दि. ५ –टीम अण्णातील अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनिष सिसोदिया या चार सदस्यांमुळे अण्णा हजारे त्रस्त झाले असून हे चौघेही अण्णांच्या मताचा आदर करीत नाहीत. त्यामुळे अण्णा त्यांना कोर समितीतून काढून टाकण्याच्या विचारात होते, असा खळबळजनक गौप्यस्फोट अण्णांचा ब्लॉग लिहिणारे राजू परुळेकर यांनी शनिवारी ब्लॉगवर केला. या चौघांना आपण कंटाळल्याने त्यांना कोर समितीतून काढून टाकणार असल्याचे अण्णांचे पत्र परुळेकर यांनी ब्लॉगवर टाकले आहे. त्यामुळे अण्णा हजारे खोटे बोलत आहेत का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.




अण्णांच्या मौनव्रतादरम्यान त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक ब्लॉग तयार करण्यात आला. हा ब्लॉग तयार करण्याचे काम पत्रकार राजू परुळेकर यांच्याकडे सोपविण्यात आले होते. लवकरच कोर समिती भंग करण्यात येणार असल्याचे राजू परुळेकर यांनी अण्णाच्या मौनव्रतादरम्यान ब्लॉगमध्ये लिहिले होते. याबाबत पत्रकारांनी काल शुक्रवारी नवी दिल्लीतील पत्रकार परिषदेत अण्णांना प्रश्न विचारला असता कोर समिती भंग करण्याचा आपला कोणताही विचार नसल्याचे अण्णांनी सांगितले. परुळेकर यांचे काम व्यवस्थित होत नसेल तर ते बंद करू, असे वक्तव्य अण्णांनी काल केले होते. त्यामुळे परुळेकर नाराज झाले.

परुळेकर ब्लॉगवर म्हणाले की, मी अण्णांच्यावतीने लिहिताना माझ्या मनाचे काहीही लिहिले नाही. जे अण्णा लिहायचे तेच ब्लॉगवर टाकण्यात येत होते. कोर समिती भंग करण्याचा अण्णांचा विचार होता. तसे त्यांनी पत्रही लिहिले आहे. कोर समिती बरखास्त करून विस्तार करण्याबाबत केजरीवाल, बेदी, प्रशांत भूषण आणि मनिष सिसोदिया हे अण्णांच्या मताशी सहमत नाहीत हे चौघे अण्णांच्या मतांचा आदर करीत नाहीत. आपलेच म्हणणे खरे करून दाखवतात. त्यामुळे अण्णा त्यांना दूर करण्याच्या विचारात होते. त्यासाठी अण्णांनी २३ ऑक्टोबर २०११ रोजी ब्लॉगवर लिहिण्यासाठी पत्र लिहून दिले होते. त्यावेळी अण्णाचे स्वीय सहायक सुरेश पठारे यांनी हा मजकूर ब्लॉगवर टाकू नका, अशी विनंती केली होती. त्यामुळे ते पत्र आपण ब्लॉगवर टाकले नव्हते. काही पत्रकारांनी आपण काँग्रेसच्या मंत्र्यांचे एजंट असल्याची टीका केली. त्यामुळे आपण व्यथित झालो. केजरीवाल, बेदी, प्रशांत भूषण आणि सिसोदिया यांना अण्णा कंटाळल्याचे आपण वारंवार सांगत आलो आहे ते अण्णांचे काहीही ऐकत नाहीत.